**जिल्हा नागरी विकास यंत्रणा (DUDA),**
**जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.**
**निविदा सूचना**
**प्रशिक्षणासाठी नोडल एजन्सी नेमणेबाबत**

**केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना (SJSRY) अंतर्गत दारिद्र्यरेषेखालील (BPL) लाभार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी लाभार्थ्यांची निवड व प्रशिक्षणानंतर त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मिळवून देणे यासाठी जिल्हा स्तरावर एक वा अधिक नोडल संस्थांची निवड करावयाची असून याद्वारे इच्छुक संस्थांकडून निविदा मागविण्यांत येत आहेत.**

**नियुक्त करावयाच्या नोडल संस्थांची जबाबदारी:-**

अ) ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांचे क्षेत्रांत स्वयंरोजगाराला वाव असणाऱ्या व्यवसायाचा सर्वेक्षणाद्वारे शोध घेऊन, कोणकोणत्या व्यवसायाचे प्रशिक्षण योजनेच्या लाभार्थ्यांना दिल्यास, त्यांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध होऊ शकेल, अशी व्यवसायाची क्षेत्रे जिल्हा नागरी विकास यंत्रणेला सुचविणे.

ब) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, स्थानिक महानगरपालिका/नगरपरिषदा यांच्या मदतीने क्षेत्रीय पातळीवर स्थानिक लाभार्थ्यांची, त्यांची पात्रता, आवड, कल, इ. लक्षात घेऊन बाजारात रोजगारासाठी वाव असलेल्या व्यावसायिक प्रशिक्षणासाठी निवड करणे.

क) अशा व्यावसायिक प्रशिक्षणासाठी निवडलेल्या लाभार्थ्यांचे प्रशिक्षण, जिल्हा नागरी विकास यंत्रणेने मान्यता दिलेल्या (Accredited) संस्थांकडून आयोजित करण्याचे नियोजन करणे.

ड) प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण व्यवस्थितरित्या होते की नाही याचे संनियंत्रण करणे व तसा अहवाल वेळोवेळी संबंधित महानगरपालिका/नगरपरिषदा व DUDA ला सादर करणे व त्यास जिल्हा यंत्रणेच्या अध्यक्षांची मान्यता घेणे.

इ) राज्य स्तरावर शासनातर्फे नेमण्यांत येणाऱ्या सर्वे आणि प्लेसमेंट एजन्सीला आवश्यकतेनुसार सर्वेक्षण वा तत्सम कार्यासाठी सहकार्य करणे.

ई) उद्योगक्षेत्रातील व समाजातील रोजगारासंबंधीची गरज लक्षात घेऊन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यांस मदत करणे.

प) प्रशिक्षणानंतर लाभार्थ्याला रोजगार व स्वयंरोजगार मिळवून देणे व याकामी राज्यस्तरावरील सर्वे आणि प्लेसमेंट संस्थेच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.

फ) प्रशिक्षणार्थ्यासाठी भविष्यात उपलब्ध होणाऱ्या निरनिराळ्या उद्योगांमधील रोजगाराच्या/ स्वयंरोजगाराच्या संधी, लाभार्थ्यांना मिळवून देणे.

नोडल यंत्रणेच्या पात्रतेचे निकष:-

१. नोडल यंत्रणा ही संस्था अधिनियमांनुसार नोंदणीकृत शासकिय वा खाजगी संस्था असावी.
२. या क्षेत्रात काम करणाऱ्या शासकिय स्वायत्त संस्थानांदेखील नोडल यंत्रणा म्हणून सहभागी होता येईल.
३. नोडल यंत्रणा ही किमान तीन वर्षांपासून कार्यरत असावी.
४. नोडल यंत्रणेत किमान तीन वर्षाचा व्यावसायिक प्रशिक्षण/रोजगार /स्वयंरोजगार या क्षेत्रात काम केल्याचा अनुभव असावा.
५. नोडल यंत्रणेची किमान वार्षिक उलाढाल रु. १५.०० लक्ष पेक्षा कमी नसावी.
६. ठाणे जिल्ह्यात काम केलेल्या संस्थेस प्राधान्य दिले जाईल.

नोडल यंत्रणेने त्यांना वरीलप्रमाणे त्यांना करावयाच्या सर्व कामांसाठी, देय मोबदला, प्रति लाभार्थी प्रदान करावयाच्या रकमेच्या स्वरुपात, आपल्या निविदेत नमूद करावा.

नोडल यंत्रणेस प्रति लाभार्थी मान्य रकमेच्या ६०% रक्कम लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झल्यानंतर ३०% संबंधीत लाभार्थ्यांस प्रशिक्षणानंतर रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिल्यानंतर प्रदान केले जाईल. तसेच, उर्वरित १०% रक्कम राज्यस्तरीय सर्वे व प्लेसमेंट एजन्सीला देय करण्यांत येईल.

**इतर अटी व शर्ती :-**

१. निविदा स्विकृत झालेल्या संस्थेस योग्य त्या किंमतीच्या स्टँपपेपरवर जिल्हा नागरी विकास यंत्रणेने निश्चित केलेल्या अटी व शर्तीचा करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
२. संस्थेचे काम समाधान कारक न आढळल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता संस्थेची निवड रदद केली जाईल व याबाबत कोणतीही नुकसान भरपाई मागण्याचा संस्थेला अधिकार असणार नाही.
३. कोणतीही सशर्त निविदा स्विकारण्यात येणार नाही.
४. निवड झालेल्या संस्थेची कामकाजाची मुदत ३ आर्थिक वर्षे असेल (सन २०१२-२०१३ पर्यंत ) प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांपैकी किमान ५०% लाभार्थ्यांना

रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अन्यथा संस्थेची निवड रदद करण्याचा अधिकार जिल्हा नागरी विकास यंत्रणा यांचेकडे निहीत राहील.

याबाबतचे कोरे निविदा प्रपत्र जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास यंत्रणा, ४ था मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडून कार्यालयीन वेळेत रु. १,०००/- रोखीने (विना परतावा) भरुन दिनांक ५/७/२०१० पर्यंत प्राप्त करता येतील. दिनांक ६/७/२०१० पर्यंत कार्यालयीन वेळेत इच्छुक संस्थांनी आपली निविदा वरील कार्यालयात सादर करावी.

प्रस्तावासोबत रु. २५,०००/- एवढ्या रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष अनामत रक्कम म्हणून जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा नागरी विकास यंत्रणा, ठाणे या नांवे काढून सादर करावा लागेल.

प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे, करारनाम्यातील अटी व शर्ती, नोडल यंत्रणा निवडीची पद्धत, इ. ची माहिती कोऱ्या निविदा प्रपत्रासोबत पुरविण्यांत येईल.

प्राप्त निविदांपैकी कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार, जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा नागरी विकास यंत्रणा ठाणे यांनी राखून ठेवले आहेत.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा नागरी विकास यंत्रणा,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.**